

# डॉ. डी.टी. शिर्के यांनी स्वीकारली कुलगुरू पदाची सूत्रे

कोल्हापूर, दि. ७ ऑक्टोबर : शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी आज सायंकाळी प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडून कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली.

डॉ. डी.टी. शिर्के यांनी सायंकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास कुटुंबियांसमवेत अभिवादन केले. विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर भाऊराव पाटील, विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यांना नूतन कुलगुरूंनी काल सायंकाळीच अभिवादन केले. त्यांच्यासमवेत पत्नी सौ. सुनिता आणि मुलगी श्रद्धा उपस्थित होत्या. डॉ. करमळकर यांनी डॉ. शिर्के यांचे स्वागत केले. त्यानंतर कुलगुरूंच्या दालनामध्ये नूतन कुलगुरूंकडे सूत्रे प्रदान करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात आली. कार्यभाराच्या पत्रांचे हस्तांतरण व ज्ञानदंड स्वीकारून डॉ. शिर्के यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाचे तेरावे कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला.

कार्यभार स्वीकारल्यानंतर विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांकडून नूतन कुलगुरूंनी सुहास्य वदनाने शुभेच्छांचा स्वीकार केला. या प्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांच्यासह व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व अधिसभा सदस्य उपस्थित होते.

**प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांना निरोप**

प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या अल्प प्रभारी कुलगुरू पदाच्या कार्यकाळात शांत, समंजस व संयमी कारभाराचे प्रत्यंतर आले. त्यामुळे त्यांची अल्प कारकीर्दही संस्मरणीय ठरली, अशा शब्दांत कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी डॉ. करमळकर यांचा गौरव केला. प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांना आज निरोप देण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व अधिसभा सदस्यांनी डॉ. करमळकर यांच्याविषयी अभिनंदनपर मनोगते व्यक्त केली.

डॉ. करमळकर यांनी शिवाजी विद्यापीठातील आपली ही कारकीर्द संस्मरणीय ठरली. सर्वच घटकांचे अत्यंत सौहार्दपूर्ण सहकार्य लाभले, याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह, शिवप्रतिमा देऊन त्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमास नूतन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, सौ. सुनिता शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील उपस्थित होते.